# एस.वाय.बी.ए. जी.-२

# आधुनिक साहित्य प्रकार

## कादंबरी स्वरूप व घटक

प्रा.डॉ. महादेव कांबळे

कादंबरी हा वाङ्मय प्रकार मराठीत आंग्ल संपर्कातूनच आपल्याकडे आला आहे. इंग्रजीमध्ये कादंबरीला 'नावल' किंवा 'नॉवेल' असे म्हणतात. या नामाभिधानावरून मराठीमध्ये कांदबरी हा वाङ्मयप्रकार रूढ झाला आहे. वास्तविक पाहता आंग्ल संपर्कानेच आपल्याला कादंबरीचे भान आले असे खात्रीने म्हणावे लागते. कारण सुरवातीच्या काळात आपण फक्त इंग्रजी कादंबऱ्यांचे स्वैर अनुवाद व भाषांतरच करीत आलो आहोत. खरे तर अगदी १२ व्या, १३ व्या शतकापासून मराठीत लीळाचरित्रासारखे अव्वल दर्जाचे गद्य मराठी भाषेत लिहिले गेले होते. ज्याच्याकडे कादंबरी म्हणून पाहणे नक्कीच शक्य झाले असते. तरीही प्रस्तुत वाङ्मय प्रकार इंग्रजीच्या आगमनानंतरच मराठी साहित्यात विकसित झालेला दिसून येतो. या वाङ्मय प्रकाराचा घाट मोठा असून कथानक, उपकथानक, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती, इ. घटकांनी विकसित झालेला हा वाङ्मय प्रकार आहे, असे असले तरी "एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव मराठीमध्ये बऱ्याच आधीपासून रूढ असावे"[१], असे कुसुमावती देशपांडे जो तर्क काढतात तो योग्यच वाटतो.

## कांदबरी म्हणजे काय ?

आधुनिक कालखंडात कादंबरी हा सर्वाधिक लोकप्रिय आणि वाचला जाणारा वाङ्मय प्रकार आहे. वास्तविक पाहता कोणत्याच ललित साहित्यकृतीची व्याख्या करता येत नाही. खरे तर समीक्षक किंवा वाङ्मयाचे जाणकार त्या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये किंवा लक्षणे सांगत असतात. प्रस्तुत ठिकाणी लेखक, समीक्षक, जाणकारांनी कादंबरीच्या अनेक व्याख्या केलेल्या आहेत. भालचंद्र नेमाडे यांच्या मते, "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत सरंचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली अशी साहित्यकृती असते."[२]

'साहित्यसाधना' या समीक्षा ग्रंथात प्रा. माधव काशिनाथ देशपांडे यांनी कांदबरीची व्याख्या केलेली आहे. ती अशी – "जीवनाचे कलात्मक व विस्तृत गद्य चित्र म्हणजे कादंबरी."[३]

'मराठी कादंबरी पहिले शतक' (१८५०-१९५०) या कादंबरीवरील समीक्षा ग्रंथामध्ये कुसुमावती देशपांडे म्हणतात की, "एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव बऱ्याच आधीपासून रूढ असावे".[४] यावरून असे लक्षात येते की, कादंबरीमध्ये कल्पना विस्ताराला विशेष महत्त्व आहे.

## कादंबरीचे घटक -

कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा अभ्यास करताना व कादंबरीचे रचनातंत्र समजून घेताना तिला साकार करणाऱ्या घटकांचा परामर्श घेणे येथे विशेष महत्त्वाचे आहे. ते घटक पुढीलप्रमाणे -

### १. कथानक -

कादंबरीत एखादे महत्त्वाचे कथानक नेहमीच असते, याचा अर्थ असा की, कादंबरीमध्ये ज्या असंख्य घटना आणि प्रसंग घडून येतात त्यातूनच एक बांधेसूद असे चित्र उभे राहते. प्रत्येक कादंबरीत कादंबरीकाराला काही तरी सांगायचे असते, त्याचे बीज अगोदरच त्याच्या मनात पडते. कादंबरीच्या विषयाचे बीज अशा रीतीने लेखकाच्या मनातून स्फुरल्यानंतर त्याला हळूहळू कादंबरीचे कथानक आकारू लागते. वाचकाचे चित्त व कुतूहल सतत जागृत राहील अशी कथानकाची रचना असते. थोडक्यात असे सांगता येईल की, कार्यकारणभावाची संगती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला म्हणजे तेथे कथानक निर्माण होते.

### २. व्यक्तिरेखा -

कादंबरीच्या कथानकाला जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व कादंबरीतील व्यक्तिरेखा या घटकाला आहे मानवी जीवन हा कादंबरीचा विषय असला तरी मानव हे फार मोठे गूढ आहे आणि कादंबरीतील चित्रविचित्र व्यक्ती मानवी जीवनाच्या

अभूतपूर्व आणि अभिनव आंगोपांगाची जाणीव वाचकांच्या मनामध्ये निर्माण करतात. या व्यक्तिरेखा वास्तवावर आधारलेल्या असल्यातरी निख्खळ वास्तवातील व्यक्तींची जशीच्या तशी प्रतिबिबे नसतात, तर लेखकाच्या प्रतिभा सामर्थ्याने अधिक आकर्षक, कलात्मक आणि अधिक परिणामकारक बनलेली लेखकाची ती मानसचित्रे असतात. कादंबरीकाराच्या व्यापक सूक्ष्म निरीक्षणातून या व्यक्तिरेखा आपणासमोर जिवतपणे साकार होतात आणि आपण त्यांच्या भावविश्वाशी समरस होतो म्हणून हा कादंबरीचा घटक येथे विशेष महत्त्वाचा ठरतो.

### ३. वातावरण निर्मिती –

प्रत्येक कादंबरीची किंवा कादंबरीकाराची प्रकृती भिन्न असते. त्याचे कारण काही विशिष्ट वातावरणाची पार्श्वभूमी प्रत्येक कादंबरीला लाभलेली असते. वातावरणनिर्मिती शिवाय कादंबरीला जिवंतपणा येत नाही, म्हणून वातावरण निर्मिती हा कादंबरीचा लक्षणीय विशेष मानण्यात येतो. कादंबरीतील व्यक्ती कोणत्याही पोकळीत जगत नाहीत त्यांची मुळे कादंबरीमध्ये कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीने निर्माण केलेल्या वातावरणात रूजलेली असतात. कादंबरीतील व्यक्तींच्या अंतःर्बाह्य वर्तनाला चालना देण्याचे फार मोठे सामर्थ्य वातावरणामध्ये असते, म्हणूनच कादंबरीच्या रचनातंत्राचा एक महत्त्वाचा घटक म्हणून वातावरणाकडे पाहता येते.

## ४. निवेदन –

कोणतीही कादंबरी भाषिक निवेदनाच्या मदतीशिवाय वाचनीय रूप धारण करू शकत नाही. आपली कादंबरी वाचकांना शब्दबद्ध रूपात वाचता यावी, एवढ्याच मर्यादित रचनेत कादंबरीच्या भाषिकनिवेदनाला अतिशय महत्त्व आहे. कारण कादंबरीचा समग्रपट वाचकांसमोर उलगडण्यासाठी निवेदनाशिवाय दुसरा पर्याय नाही. कादंबरीद्वारा अभिव्यक्त होणाऱ्या अनुभवाची सगळी परिमाणे निवेदनातूनच सूचित होतात. या निवेदनतंत्राचा पायरी–पायरीने किंवा क्रमाक्रमाने लेखक वापर करतो. कादंबरीला साकार करणाऱ्या सर्व घटकांचा तपशील पुरविण्यासाठी आणि विशिष्ट दृष्टिकोणातून त्यांची मांडणी करण्यासाठी कादंबरीकाराजवळ निवेदन हे एक साधन उपलब्ध असते आणि या साधनाचा वापर कादंबरीकाराने अतिशय सावधपणे करणे आवश्यक आहे.

## ५. भाषाशैली –

कादंबरीतील पात्रे ही लेखकाच्या हातची खेळणी होऊ नये, म्हणून त्यांना स्वतःच्या भाषेत बोलता आले पाहिजे. एकूण व्यक्तिमत्त्वानुसार पात्रांची भाषा असणे गरजेचे आहे, कादंबरीकाराच्या मनोवृत्तीतून त्याची लेखनशैली निर्माण होत असते. भाषाशैलीमुळेच कादंबरी लेखनात परिणामकारकता येते.